ह व ल – २
[illegible]
२०२२

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II
★२०२२★

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

## :: भाडेकरार ::

भाडेकरार (६० महिने मुदतीचा) आज दि. ९, माहे – फेब्रुवारी, रोज – मंगळवार, सन.२०२२, इसवी ते दिवशी :-

| | | |
|---|---|---|
| **मे.दुगड फॅमिली ट्रस्ट तर्फे** | ) | |
| **श्री. किर्ती माणिकचंद दुगड** | ) | |
| वय अं. ५१, धंदा – शेती,व्यापार, | ) | लिहून घेणार |
| राहणार : स.नं.६८६, प्लॉट नं.५, | ) | |
| नाटेकर सोसायटी, बिबवेवाडी, पुणे –३७. | ) | |

... यांसी ....

| | | |
|---|---|---|
| **कै.पै.महाराष्ट्र केसरी हिरामण बनकर** | ) | |
| **चॅरिटेबल ट्रस्ट** या संस्थेचे **कै.पै.के.** | ) | |
| **हिरामण बनकर विद्यालय,** सुखसागरनगर, | ) | |
| कात्रज, पुणे – ४११०४६. **तर्फे** | ) | लिहून देणार |
| **श्री. प्रमोद माणिकचंद दुगंड** | ) | |
| वय – ५५, धंदा – शेती,व्यापार | ) | |
| राहणार : वसंतबाग सोसायटी, | ) | |
| बिबवेवाडी, पुणे – ४११०३७. | ) | |

**कारणे भाडेकरार लिहून ठेवतो तो येणेप्रमाणे :-**

(१) **मिळकतीचे वर्णन** :- तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली पुणे यांचे कक्षेतील तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील गांव मौजे. **कात्रज (सुखसागरनगर)** येथील सर्व्हे नं.१०/११, मिळकत क्र.११७५, १२०७, १२०८ व इतर मिळकत यांसी क्षेत्रफळ ४३०३.३२ चौरस फूट व सुमारे ९००० चौ.फूट मोकळी जागा.

हवल - २
२०२२
THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II

(२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली जागा ही लिहून घेणार यांच्या मालकी हक्काची व वहिवाटीची असून ती नुकतीच नव्याने बांधलेली असून, त्यांचे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मे.१९८९, १९९१ रोजी ग्रामपचांयत कात्रज यांचेकडून मिळालेले आहे.

(३) लिहून देणार ही एक चॅरिटेबल शिक्षण संस्था आहे. सदर संस्थेने सुरूवातीला स्वतंत्र जागेची सोय होत नसल्याने व नविन स्थापनेमुळे भविष्यकाळात मुलांची संख्या पुरेशी प्रमाणात वाढल्यामुळे विस्तारीत मोठया जागेची सोय अन्यत्र होईपावेतो त्या काळासाठी लिहून देणार यांना जागेची जरूरी होती. त्याप्रमाणे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचेकडे त्या काळासाठी शाळेच्या उपयोगासाठी जागेची मागणी केली व ती मान्य करून लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालील अटीं व शर्तीवर जागा वापरण्यास दिली आहे.

(४) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली जागा/मिळकत लिहून घेणार यांनी लिहून देणार संस्थेला दि.०१/०३/२०२० पासून ताब्यात दिली असून या काळापासून **पाच** वर्षाकरिता या संस्थेस लिहून देणार या शिक्षण संस्थेस फक्त शाळा चालविणेसाठी वापरण्यास दिली आहे.

(५) सदर जागेच्या/मिळकतीच्या वापराबद्दल लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना स्वामित्वाची रक्कम रू.१/- प्रती चौ.फूट एवढे देवावयाचे आहेत. सदरची रक्कम ही दरमहा १० तारखेच्या आत चेकने द्यावयाची आहे, व त्याबाबतची पावती घ्यावयाची आहे.

(६) आपसांत ठरल्यानुसार वर नमूद जागा/मिळकतीबाबतच्या प्रस्तुत भाडे कराराची मुदत संपल्यानंतर वीस वर्षाच्या मुदतीकरिता भाडे कराराची मुदत वाढवून देण्याचे लिहून घेणार यांनी मान्य व कबुल केलेले आहे. सबब त्याकरिता दर पाच वर्षे मुदत संपल्यानंतर पुन्हा पाच वर्षे मुदतीचा भाडेकरार करण्यात येईल. मात्र अशाप्रकारे संस्थेस पुढील कालावधीसाठी जागेची आवश्यकता भासल्यास व लिहून घेणार यांनी संस्थेस मुदत वाढवून दिल्यास शासकीय नियमाप्रमाणे लिहून देणार या संस्थेने लिहून घेणार यांना भाडे वाढ द्यावयाची आहे.

हवल - २
२०११ / ६ / १४
२०२२

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II
दुय्यम निबंधक हवेली क्र. २ यांची मुद्रा
२०२२

(७) सदर जागेत बांधकामाचे काळात शाळेचे वर्ग व ऑफिस उपयोग करून राहील. मात्र आजुबाजुचे चतुःसिमेलगतचे इतर मालकांना अगर रहिवाशांना मुलांच्या वर्तनातुन कोणत्याही प्रकारचा त्रास उपद्रव होणार नाही याची दक्षता लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे. व अशा तक्रारी असल्यास व त्याबाबत कायदेशीर कारवाई झाल्यास त्याची सर्व परिणामांची जबाबदारी ही लिहून देणार या संस्थेवर राहील.

(८) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली जागा ही नुकतीच नव्याने बांधलेली आहे. सबब संस्थेकडून अगर मुलांचे वापराने जागेच्या कोणत्याही भागाचे नुकसान झाल्यास अगर इमारतीचे सौंदर्यात बिघाड झाल्यास त्याची जबाबदारी लिहून देणार या संस्थेवर राहील त्याची भरपाई संस्थेने करून द्यावयाची आहे.

(९) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जागेचे वापराबरोबर तेथे पिण्याचे व अन्य वापराचे पाण्याची सोय केलेली आहे. त्याचे पुढील बिल लिहून देणार यांनीच भरावयाचे आहे. तसेच सदर मिळकतीचा मिळकत कर शासकीय नियमाप्रमाणे लिहून देणार यांनी भरावयाचा आहे.

(१०) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जागेत वापरासाठी इलेक्ट्रीक लाईट मीटर व वायरिंग केलेले आहे, त्या मीटरमधील लिहून देणार यांनी विद्युत वापर करावयाचा आहे व आजपासून सदर लाईटबील लिहून देणार यांनी भरावयाचे आहे.

(११) सदर जागेच्या भाडेकराराची मुदत संपल्यानंतर ज्या परिस्थितीत जागा ताब्यात घेतली होती त्याच परिस्थितीत लिहून देणार यांनी सदरची जागा लिहून घेणार यांना परत दयावयाची आहे.

(१२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली जागा लिहून देणार यांना संस्थेने एक प्रमुख पदाधिकारी यांच्यामध्ये बदल झाल्यास अगर नविन पदाधिकारी आल्यास त्यांच्यावरही वरील सर्व अटीं व शर्ती बंधनकारक राहतील. करार संपताच जागा मालकास ताब्यात द्यावी या अटीवरच सदरची जागा संस्थेस दिलेली आहे.

(१३) वरील अटीं शर्तींनुसार व योग्य पध्दतीने लिहून देणार यांनी जागेचा वापर करावा.

हवल - २
2591 / ६/२४
२०२२

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II
दुय्यम निबंधक हवेली क्र २ यांची मुद्रा
२०२२

येणेप्रमाणे सदरचा भाडेकरार लिहून ठेवला असे.

सही/-



**भाडेकरार लिहून देणार**

कै.पै.महाराष्ट्र केसरी हिरामण बनकर चॅरि.ट्रस्ट
या संस्थेचे कै.पै.म.के.हिरामण बनकर विद्यालय तर्फे
श्री. प्रमोद माणिकचंद दुगड

सही/-



**भाडेकरार लिहून घेणार**

मे.दुगड फॅमिली ट्रस्ट तर्फे
श्री.किर्ती माणिकचंद दुगड

**साक्षीदार :**

१) सही/-

नांव : महादेव विठ्ठल मारवे

पत्ता : बिबवेवाडी पुणे ३७

------------------------------

२) सही/-

नांव : विशाल विनायक [illegible]

पत्ता : बिबवेवाडी पुणे-37

------------------------------